**वनपट्टेधारकांच्या वनहक्क दाव्यांसंदर्भातील वनहक्क दावे अंतिम करण्यासंदर्भातील कार्यवाही व मंजर वनपट्टे वाटपाची कार्यवाही ही दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीमध्ये अभियान स्वरूपात राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन परिपत्रक क्र.जमीन-३०२६/प्र.क्र.८९/जमीन-६.**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- १० सप्टेंबर, २०२६.**

**संदर्भ :**

१. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६.
२. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) नियम, २००८ व त्यामधील सुधारणा.
३. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके.

**प्रस्तावना :**

वनपट्टेदारांचे दावे म्हणजे प्रामुख्याने अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ (Forest Rights Act - FRA) अंतर्गत वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दावे अभिप्रेत आहेत. या दाव्यांना मंजुरी देण्याची प्रक्रिया ग्रामस्तरीय वन हक्क समिती → उपविभागस्तरीय वन हक्क समिती → जिल्हास्तरीय वन हक्क समिती अशा तीन प्रमुख स्तरांवर होते. पात्र वैयक्तिक व सामुहिक वन हक्क दाव्यांच्या तपासणीची कार्यवाही विहित प्रक्रियेनुसार पूर्ण करून पात्र दावेदारांना वन हक्क प्रदान करण्याच्या कार्यवाहीस गती देण्याकरीता राज्यात विशेष कालबद्ध वनहक्क मोहीम दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीमध्ये अभियान स्वरूपात राबविण्याबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

या मोहिमेअंतर्गत संबंधित ग्रामस्तरीय वन हक्क समिती, उपविभागस्तरीय वन हक्क समिती व जिल्हास्तरीय वन हक्क समिती यांनी खालीलप्रमाणे कालबद्ध कार्यवाही करावी :-

**१. ग्रामस्तरीय वन हक्क समितीची कार्यवाही- दि.१७, १८ व १९ सप्टेंबर, २०२६.**

१) ग्रामसभेने गठीत केलेल्या संबंधित ग्रामस्तरीय वन हक्क समितीने सर्व वैयक्तिक व सामुहिक वन हक्क दाव्यांची पूर्वतयारी दि.१७, १८, व १९ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत पूर्ण करावी.

२) प्राप्त दाव्यांचे अर्ज, उपलब्ध पुरावे, संबंधित अभिलेख, दाव्यातील क्षेत्र, सीमांकन व इतर आवश्यक बाबींची तपासणी करावी.

३) आवश्यकतेनुसार महसूल व वन विभागाच्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने दाव्यांची स्थळपडताळणी व अभिलेखीय पडताळणी पूर्ण करावी.

४) प्रत्येक दाव्याबाबत ग्रामस्तरीय वन हक्क समितीने कायद्यातील तरतुदींनुसार विचार करून मंजूर/नामंजूर/आंशिक मंजुरीबाबतचा निर्णय विहित पद्धतीने नोंदवावा.

**२. ग्रामसभेची कार्यवाही – दि.३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबर, २०२६.**

१) ग्रामस्तरीय वनहक्क समितीने आपल्या शिफारशीसह अंतिम केलेले दावे ग्रामसभेने उपविभागस्तरीय वनहक्क समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी दि.३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत पाठवावेत.

**३. उपविभागस्तरीय वन हक्क समितीकडील प्रलंबित दावे.**

१) ग्रामसभांकडून यापूर्वी उपविभागस्तरीय समितीकडे प्राप्त झालेले आणि अद्याप अंतिम निर्णयाच्या प्रतिक्षेत असलेले सर्व वैयक्तिक व सामुहिक वन हक्क दावे या मोहिमेदरम्यान प्राधान्याने हाताळावेत.

२) संबंधित दाव्यांची अभिलेखीय तपासणी, आवश्यक सुनावणी/पडताळणी करुन समितीचा निर्णय दि.३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत देण्याचा प्रयत्न करावा.

३) उपविभागस्तरीय समितीने पात्र/अपात्र म्हणून शिफारस केलेल्या दाव्यांची पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावयाचे दावे विलंब न करता पाठवावेत.

**४. जिल्हास्तरीय वन हक्क समितीकडील प्रलंबित दावे.**

१) उपविभागस्तरीय समितीकडून जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त झालेले व अंतिम निर्णयासाठी प्रलंबित असलेले सर्व दावे या मोहिमेत समाविष्ट करावेत.

२) जिल्हास्तरीय समितीने संबंधित दाव्यांची कायद्यानुसार तपासणी करून आवश्यक असल्यास संबंधित पक्षांना संधी देऊन अंतिम निर्णय दि.३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत देण्याची कार्यवाही करावी.

३) पात्र दावे मंजूर करून त्याबाबतची पुढील अभिलेखीय व वन हक्क प्रदान करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करावी.

**५. मंजूर वन हक्कधारकांना ७ ई /१२ ई नमुन्यात वन हक्क अभिलेख/पट्टा प्रदान करण्याची विशेष मोहीम.**

१) यापूर्वी सक्षम समितीमार्फत वन हक्क मंजूर झालेल्या पात्र वन हक्कधारकांची स्वतंत्र यादी तयार करावी.

२) अशा मंजूर दावेदारांना शासनाने नव्याने निश्चित केलेल्या ७ ई/१२ ई नमुन्यात वन हक्क अभिलेख/वनपट्टा प्रदान करण्याची कार्यवाही दि.३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत विशेष मोहिमेद्वारे पूर्ण करावी.

३) संबंधित महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने मंजूर वन हक्कधारकांची नावे, मंजूर क्षेत्र, गट/सर्व्हे क्रमांक व इतर अभिलेखांची अचूकता तपासून ७ ई/१२ ई नमुना तयार करावा.

४) पात्र वन हक्कधारकांना सदर अभिलेख/वनपट्टा समारंभपूर्वक किंवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी.

**६. समन्वय व जबाबदारी.**

१) सदर मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील मोहिमेचे समन्वय व संनियंत्रण करावे.

२) उपविभागीय अधिकारी यांनी उपविभागस्तरीय कार्यवाहीचे समन्वय व नियमित आढावा घ्यावा.

३) संबंधित तहसीलदार, ग्रामस्तरीय अधिकारी व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्याकडे सोपविलेली कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी.

**७. प्रगतीचा अहवाल.**

१) प्रत्येक जिल्ह्याने मोहिमेपूर्वी प्रलंबित दाव्यांची संख्या, ग्रामसभा/उपविभागस्तरीय समिती/जिल्हास्तरीय समिती स्तरावरील प्रकरणे तसेच यापूर्वी मंजूर झालेल्या वन हक्कधारकांची संख्या यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ ते प्रपत्र-५ मध्ये संकलित करावी.

२) दि.१७ ते १९ सप्टेंबर, २०२६ तसेच दि.३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीतील कार्यवाहीचा स्वतंत्र प्रगती अहवाल शासनास विहित नमुन्यात प्रपत्र-६ मध्ये सादर करावा.

३) कोणताही पात्र दावा केवळ अभिलेखीय/तांत्रिक त्रुटीमुळे अनावश्यकपणे प्रलंबित राहणार नाही किंवा नामंजूर होणार नाही, याची दक्षता संबंधित समित्यांनी घ्यावी.

**८. कालबद्ध मोहिमेचा उद्देश.**

सदर विशेष मोहिमेचा उद्देश कायद्यातील तरतुदी व विहित कार्यपद्धतीचे पूर्ण पालन करून पात्र वैयक्तिक व सामुहिक वन हक्क दाव्यांचा प्रलंबित अनुशेष कमी करणे, निर्णय प्रक्रियेस गती देणे आणि मंजूर वन हक्कधारकांना संबंधित अभिलेख ७ ई/१२ ई नमुना वेळेत उपलब्ध करून देणे हा आहे.

सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी सदर मोहिमेस विशेष प्राधान्य देऊन निर्धारित कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०९१०१४२६४५८५४८ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.09.10 17:20:24 +05'30'

**( संजय बनकर )**
**सह सचिव, महसूल विभाग**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक विभाग) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र, मुंबई.
८) विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भव मुंबई.
१०) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
११) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) अपर मुख्य सचिव (वने), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१४) सचिव (आदिवासी विकास विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१५) सर्व विभागीय आयुक्त.
१६) सर्व जिल्हाधिकारी.
१७) सहसचिव/उपसचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती (कार्यासन जमीन-६), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रपत्र-१**

**ग्रामस्तरीय वन हक्क समितीची कार्यवाही - कार्यवाहीचा कालावधी - दि.१७, १८ व १९ सप्टेंबर, २०२६**

| अ.क्र. | तालुका | ग्रामपंचायत /गाव | प्राप्त वैयक्तिक व सामुदायिक वनहक्क दावे | पूर्वतपासणी पूर्ण दावे | स्थळ पडताळणी पूर्ण दावे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| एकूण | | | | | | |

**प्रपत्र-२**

**ग्रामसभास्तरावरील कार्यवाही - कार्यवाहीचा कालावधी : दि.३० सप्टेंबर, १ व २ ऑक्टोबर, २०२६.**

| अ.क्र. | तालुका | गाव | मंजूर दावे | नामंजूर दावे | उपविभागीय समितीकडे पाठविलेले दावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| एकूण | | | | | |

**प्रपत्र-३**

**उपविभागस्तरीय समितीकडील प्रलंबित दावे**

| अ.क्र | उप विभाग | अभियानापूर्वी प्रलंबित दावे | अभियान कालावधीत विचारात घेतलेले दावे | मंजूर | त्रुटी असल्यामुळे त्याची पुर्तता करण्यासाठी ग्रामस्तरीय समितीकडे परत केलेले दावे | नामंजूर | जिल्हास्तरीय समितीकडे पाठविलेले | अद्याप प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

## प्रपत्र-४
## जिल्हास्तरीय समितीकडील कार्यवाही

| अ.क्र. | जिल्हा | अभियानापूर्वी प्रलंबित दावे | उपविभागीय समितीकडून प्राप्त दावे | अभियानात अंतिम निर्णय घेतलेले | मंजूर | त्रुटी असल्यामुळे त्याची पुर्तता करण्यासाठी ग्राम स्तरीय समितीकडे परत केलेले दावे | नामंजूर | अद्याप प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

## प्रपत्र-५
## मंजूर वनहक्कधारकांना ७ ई/१२ ई नमुना प्रदान करण्याची कार्यवाही

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | यापूर्वी मंजूर वनहक्कधारक | ७ई/१२ई प्रदान करावयाचे | अभियानात ७ई/१२ई तयार केलेले | ७ई/१२ई प्रदान केलेले | अद्याप प्रलंबित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

**प्रपत्र-६**

**अभियानाची एकत्रित प्रगती**

| बाब | अभियानापूर्वीची संख्या | अभियानादरम्यान झालेली कार्यवाही | अंतिम स्थिती |
|---|---|---|---|
| प्राप्त वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दावे | | | |
| ग्रामस्तरीय वनहक्क समितीकडून तपासणी पूर्ण दावे | | | |
| ग्रामस्तरीय वनहक्क समितीने मंजूर केलेले दावे | | | |
| ग्रामसभेने उपविभागस्तरीय समितीकडे सादर केलेले दावे | | | |
| उपविभागस्तरीय समितीकडील प्रलंबित दावे | | | |
| उपविभागस्तरीय समितीने अंतिम निर्णय घेतलेले दावे | | | |
| जिल्हास्तरीय समितीकडील प्रलंबित दावे | | | |
| जिल्हास्तरीय समितीने अंतिम निर्णय घेतलेले दावे | | | |
| अंतिमतः मंजूर दावे | | | |
| त्रुटी पुर्ततेसाठी परत केलेले दावे | | | |
| नामंजूर दावे | | | |
| ७ ई/१२ ई  प्रदान केलेले वनहक्कधारक | | | |
| अद्याप प्रलंबित दावे | | | |

********